# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. ३२३ दिनांक १८/११/२०२१

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ड्रोन, पॅराग्लायडर्स, रिमोट कंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्ट उडविण्यास बंदी- पोलीस उपआयुक्त मुख्यालय यांचे मनाई आदेश लागू.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles यांचेवर नियमन व नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधकात्मक निर्बंध घालणे गरजेचे असल्याने श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय यांनी मानवी जिवीतास, आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता लक्षात घेता “Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles”चा वापर यावर फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये मनाई आदेश लागू केलेले आहेत. त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांकडुन करण्यात येण-या हवाई सर्वेक्षणास व मा. पोलीस आयुक्त यांचेकडुन विशेष परवानगीने करण्यात येणा-या वापरास सदर मनाई आदेशातील तरतुदी लागु असणार नाहीत.

सदर आदेशाचा कालावधी हा दिनांक १७/११/२०२१ रोजीचे ००.०१ पासुन ते दिनांक ११/०१/२०२२ रोजीचे २४.०० वाजे पावेतो लागु लागु असणार आहे.

-----ooooo-----